| | | |
|---|---|---|
| | **पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय** | |

**प्रेस नोट** दि.१६/०८/२०२४

# कुख्यात गुन्हेगार सुरज रणदिवे टोळीवर एम.आय.डी.सी. भोसरी पोलीस ठाणे येथे मोक्का अंतर्गत कार्यवाही

---

एम.आय.डी.सी भोसरी पोलीस स्टेशन गुन्हा रजिस्टर नंबर ३१३/२०२४ भा.दं.वि. कलम ३०७,३४१,३२३,५०४,५०६,१४३,१४७,१४८,१४९,सह, भारतीय हत्यार कायदा कलम ४ (२५), महाराष्ट्र पोलीस अधिनियम सन १९५१ चे कलम ३७ (१) (३) सह १३५, क्रिमीनल ॲमेन्डमेन्ट ॲक्ट कलम ३, ७ गुन्हयाचे तपासामध्ये सदर गुन्हा टोळीने व संघटीतपणे केला असल्याचे निष्पन्न झाले आहे. सदर गुन्हया मध्ये महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम १९९९ चे कलम ३(१) (ii), ३ (४) ची वाढ करण्यात आली आहे. सदर टोळीचा प्रमुख हा सुरज प्रकाश रणदिवे आहे.

यातील आरोपी नामे सुरज प्रकाश रणदिवे.वय-३०वर्षे.रा.घरकुल,चिखली पुणे. हा कुख्यात गुन्हेगार असुन त्याचेवर यापुर्वी खालील प्रमाणे गंभीर गुन्हे दाखल आहेत.

१)खेड पोलीस स्टेशन पुणे.(ग्रा)गु.र.नं.३०६/२०२० भा.दं.वि.कलम ३०२,१२०(ब),१४१,१४३

२)चिंचवड पोलीस स्टेशन गुन्हा रजि. नं. ८१/२०२३ भा.दं. वि. कलम ३०२,३४

३)निगडी पोलीस स्टेशन गुन्हा रजि. नं. ५३०/२०१८ भा.दं.वि. कलम ३२६,३२४, ३२३,५०४,३४, आर्म ॲक्ट ४ (२५),२७.

सदर टोळीतील इतर सदस्य १) विवेक विनोद नाईक ऊफ सोन्या, वय २० वर्षे, रा. फ्लॅट नं१०/११, नळदुर्ग सोसायटी, बिल्डींग नंबर ए-७ पी.एम.आ.डी.ए. वसाहत सेक्टर १२, खंडेवस्ती, भोसरी, पुणे. २) सौरभ कानिपनाथ भोपले,वय २० वर्षे, रा. फ्लॅट नं११०५, केजळगड सोसायटी, बिल्डींग नंबर ए- पी.एम.आ.डी.ए. वसाहत सेक्टर १२, खंडेवस्ती, भोसरी, पुणे, ३) अर्थव उदय पकाले, वय २० वर्षे, रा. पी.एम.आ.डी.ए. वसाहत, सेक्टर १२, एमआयडीसी भोसरी पुणे, ४) प्रतीक ज्ञानेश्वर सपकाळ. वय-२८ वर्षे. रा. वाकड पुणे. ५) चेप्या उर्फ केतन गौतम सोनवणे. वय- २६ वर्षे. रा. मिलींदनगर पिंपरी पुणे. ६) लकी उर्फ लखन उर्फ सुनिल रामभाऊ पवार वय- २४ वर्षे. रा. काळाखडक झोपडपट्टी, वाकड,पुणे. ७) एक विधीसंघर्षग्रस्तबालक.

सदर टोळीची घरकुल चिखली, खंडेवस्ती, भोसरी,नेहरुनगर, पिंपरी या भागामध्ये दहशत आहे.त्यामुळे सदर टोळी प्रमुख सुरज प्रकाश रणदिवे व इतर टोळीतील सदस्य यांनी यापूर्वी सदर भागातील नागरिकांना अनेक वेळा उपद्रव केला आहे.परंतु त्याचे दहशतीमुळे त्यांचे विरुध्द कोणीही पुढे येऊन तक्रार देत नव्हते. सदर आरोपी यांनी कोणास यापूर्वी कुठल्याही प्रकारचा त्रास दिला असल्यास अथवा त्याचे बाबत कोणत्याही प्रकारची तक्रार असल्यास त्यांनी एम.आय.डी.सी. भोसरी पोलीस स्टेशन येथे संपर्क करावा असे आवाहन करण्यात येत आहे.

सदर गुन्हयाचा प्राथमिक तपास मा.पोलीस आयुक्त, श्री. विनयकुमार चौबे सो., मा.सह.पोलीस आयुक्त श्री. शशिकांत महावरकर सो.,मा.अपर पोलीस आयुक्त श्री.वसंत परदेशी सो., मा.पोलीस उपायुक्त, परि.III श्री.डॉ.शिवाजी पवार सो, सहायक पोलीस आयुक्त एम.आय.डी.सी.भोसरी विभाग श्री. सचिन हिरे, श्री.गणेश जामदार, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, एम.आय.डी.सी.भोसरी पो.स्टे. यांचे मार्गदर्शनाखाली किरण पठारे, स.पो.नि. एम.आय.डी.सी. भोसरी पोलीस स्टेशन यांनी केला असून सदर गुन्हयाचा पुढील तपास डॉ.विशाल हिरे, सहायक पोलीस आयुक्त, गुन्हे शाखा, पिंपरी चिंचवड हे करीत आहेत.

(डॉ.शिवाजी पवार)
पोलीस उप आयुक्त
परिमंडळ-३, पिंपरी चिंचवड